## न्यायदंडाधिकरी प्रथमवर्ग, न्यायालय क्रं.३, इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर यांचे न्यायालयात

### (पिठासीन अधिकारी अर्चना एम. गायकवाड )

<table>
<tr><td rowspan="4">MHKO050042682024</td><td rowspan="2">संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२५४७/२०२४ निशाणी क्र.१८ सोबत</td><td>दाखल तारीख</td><td colspan="3">३१/०७/२०२४</td></tr>
<tr><td>नोंदणी तारीख</td><td colspan="3">०८/०८/२०२४</td></tr>
<tr><td rowspan="2">महाराष्ट सरकार<br>विरुद्ध<br>राहुल पांडुरंग आबाळे व इतर १०</td><td>निकाल तारीख</td><td colspan="3">०५/०५/२०२६</td></tr>
<tr><td>कालावधी</td><td>वर्ष<br>०१</td><td>महिने<br>०९</td><td>दिवस<br>०७</td></tr>
</table>

:- न्यायनिर्णय -:-

**(घोषित दि. ०५/०५/२०२६)**

सदर कामी सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींचे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. एकंदरीत खालील विचारार्थ बाबी माझे समोर निर्माण होतात त्यावरील माझे निष्कर्ष प्रस्तुत कारणमिमांसेच्या आधारे मी पुढील प्रमाणे नोंदवित आहे-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, दिनांक १६/०७/२०२३ रोजी २०.५७ वाजणेचे सुमारास आरोपी क्र. १ याचे राहते घराच्या दुस-या मजल्यावर, अवधुत आखाडा, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे आरोपी क्र. १ ते ११ हे पत्त्याचे भारी पानावर चढाओढीने पैसे लावून तीन पानी पत्त्याचा जुगाराचा खेळ खेळत असताना मिळुन आले व त्याव्दारे आरोपींनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४ व ५ अन्वये गुन्हा केला ? | **नकारार्थी.** |
| २. | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करीता :-**

२. यातील आरोपी यांच्या ताब्यातुन जुगाराचे साहित्य मिळुन आले, ही बाब सिध्द होण्यासाठी जप्ती पंचनामा सिध्द करणे गरजेचे आहे. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ सर्जेराव तुकाराम कळंत्रे यांना तपासले असता त्यांचे साक्षीपुराव्यामध्ये असे आले आहे की, पोलिसांनी दि.१६/०७/२०२३ रोजी त्यांना पंच म्हणून बोलाविले नव्हते व त्यांच्यासमक्ष पंचनाम्यादरम्यान आरोपींच्या ताब्यातुन मोबाईल, मोटारसायकल व रोख रक्कम जप्त केली नाही. साक्षीदाराने पंचनाम्यातील सर्व मजकुर नाकारला. साक्षीदाराने पंचनाम्यातील सर्व मजकुर नाकारला. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास अनुकुल अशी साक्ष दिलेली नाही, म्हणुन अभियोगपक्षाने सदर साक्षीदार यांस उलटतपासात ग्राहय असणारे सुचक प्रश्न विचारले असता त्यातुनही अभियोगपक्षास अनुकुल ठरेल असे काहीही निष्पन्न झाले नाही.

३. अभियोगपक्षाने वर नमूद पोलिस साक्षीदाराव्यतिरिक्त इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार याकामी तपासला तसेच, सदरकामी पंच साक्षिदारांची साक्ष नोंदविली नसल्याने पंचनामा सिध्द होऊ शकला नाही. परिणामी जप्त मुद्देमाल हा आरोपी यांच्या ताब्यातून जप्त केला किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते. अभियोगपक्षाचा तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, या कामी अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द केस शाबीत करणेसाठी आरोपी क्र.१ ते ११ हे त्यांच्या फायद्याकरिता पत्त्याचे भारी पानावर चढाओढीने पैसे लावून तीन पानी पत्त्याचा हा जुगार खेळत असताना मिळून आल्याची बाब सिध्द करणे आवश्यक आहे, परंतु ते शाबीत करण्यास अभियोगपक्ष याकामी असफल ठरला आहे. तसेच, सदरची घटना सिध्द करणेकामी जप्त केलेला मुद्देमाल न्यायालयासक्षम दाखल केला नाही अथवा पंच साक्षीदारामार्फत जप्ती पंचनामा सिध्द केला नसल्याने जप्त केलेला मुद्देमाल आरोपींच्याच ताब्यातून जप्त केलेला आहे किंवा कसे ही बाबच मुळात शाबीत झालेली नाही. सबब, दोषनिश्चिती केलेल्या आरोपांचे कोणतेही घटक संशयापलिकडे सिध्द झालेले नसल्याने त्याचा फायदा आरोपींना देणे न्यायाचे ठरते. आरोपींनी गुन्हा केला असल्याबाबत भक्कम व सबळ पुरावा देण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर आहे. उपलब्ध पुरावा आरोपींनी गुन्हा केला आहे असे मानण्यास पुरेसा नाही व त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो. त्यामुळे मी **मुद्या क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी** नोंदवत आहे.

४. उपरोक्त विवेचनावरुन व निष्कर्षावरुन आरोपींना महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम ४ व ५ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने संशयापलीकडे सिध्द न केल्यामुळे आरोपींना मी निर्दोष मुक्त ठरवत आहे. यास्तव मी मुद्दा क्रं.२ करीता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. **१. राहुल पांडुरंग आबाळे, २. दिगंबर पंडीत आबाळे, ३. दिपक रावसो कांबळे, ४. मनोहर आदिनाथ नांद्रे, ५. इम्तीयाज महमंद मुजावर, ६. संजय वसंत रानभरे, ७ अविनाश रामचंद्र शिंगारे, ८. लक्ष्मीकांत चंद्रकांत रेपे, ९. विजय विलास सावंत, १०. रफिक गुलाब मुजावर व ११. राहुल बसगोंडा पाटील** यांची महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम ४ व ५ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार निर्दोषमुक्त करणेत येते.

२. आरोपींचे वैयक्तीक जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

३. यातील जप्त मुद्येमाल रोख रक्कम रुपये ६५३०/- (सहा हजार पाचशे तीस रुपये फक्त) ही अपील कालावधीनंतर सरकार जमा करणेत यावी. जप्त पत्त्याची पाने हे आजरोजी मूल्यहिन असलेने अपील कालावधीनंतर त्यांची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेत यावी.

४. जप्त मुद्देमाल आयटेल कंपनीचा मोबाईल हॅंडसेट, लावा कंपनीचा मोबाईल हॅंडसेट, विवो कंपनीचा मोबाईल हॅंडसेट, ओप्पो कंपनीचा मोबाईल हॅंडसेट, नोकीया कंपनीचा मोबाईल हॅंडसेट व हिरो होंडा कंपनीची मोटारसायकल क्र. एमएच-०९ सीवाय ७७९५ हे अपील कालावधीनंतर कागदपत्रांची पडताळणी करुन मुळ मालकाला परत करण्यात यावेत, अन्यथा अपील कालावधीनंतर योग्य ती विल्हेवाट कायदेशिररित्या करणेत यावी. तसेच, यापुर्वीच मुद्देमाल परत केला असेल तर तो आदेश अपील कालावधीनंतर कायम करण्यात येतो.

५. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे वरिष्ठ न्यायालयात हजर होण्याकरीता प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/-(अक्षरी रुपये पंधरा हजार फक्त) प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र व जामिन द्यावे, ते पुढील सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

**(न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)**

ARCHANA MANOJ GAIKWAD

Digitally signed by ARCHANA MANOJ GAIKWAD
Date: 2026.05.05 17:27:21 +0530

**दिनांक- ०५/०५/२०२६**
**इचलकरंजी**

**(अर्चना एम. गायकवाड)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३**
**इचलकरंजी, जि. कोल्हापूर.**